फौजदारी किरकोळ अर्ज क्र.८२/२०२६
(निशाणी क्र. १ सोबत)

## फिर्यादी पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचे सत्यापन (Verification)

देवा शपथ खरं सांगतो की,

माझे नाव - ललिता विष्णू नाईक,
वय वर्षे - ४३, व्यवसाय- घरकाम,
राहणार - हलकर्णी, ता.चंदगड, जि.कोल्हापूर.

**सत्यापन (Verification)**

माझ्या घरामध्ये मी, माझी दोन मुले व नात असे राहतो. मी प्रकाश कृष्णा सावंत याच्या घरी दिनांक २१/०३/२०२६ रोजी मांजर शोधण्याच्या निमित्ताने जावुन त्याच्या घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजा तोडुन सोन्याचे दागिणे चोरुन नेले अशी त्याने माझ्याविरुध्द दिनांक १७/०४/२०२६ रोजी चंदगड पोलिस स्टेशन येथे तक्रार दाखल केली आहे. त्या अनुशंगाने दिनांक १७/०४/२०२६ रोजी सायंकाळी ४.०० वाजेच्या दरम्यान पोलिस जिप घेवुन दारात आले. प्रकाश सावंत याच्या घरात सापडलेल्या चाव्या पोलिसांनी माझ्या घरातील कपाटाला लावुन बघितल्या. परंतु सदर चाव्या माझ्या घरातील कोणत्याही कुलपाला लागल्या नाहीत. तसेच पोलिसांनी माझा फोन तपासला. त्यावेळी तिथे आमच्या गल्लीतील सर्व लोक जमा झाले होते. त्यापैकी मस्णु तानाजी नाईक, गेणबा नाईक, लक्ष्मण यशवंत नाईक, रत्नाबाई कृष्णा नाईक यांनी पोलिसांना काय झाले असे विचारले असता पोलिसांनी त्यांना सांगितले की, प्रकाश सावंत याने माझ्यावर चोरीची तक्रार दाखल केलेली आहे, त्या चौकशीसाठी आम्ही आलो आहे.

२. त्यानंतर मी दुस-या दिवशी म्हणजे दिनांक १८/०४/२०२६ रोजी चंदगड पोलिस स्टेशनला येवुन प्रकाश सावंत याने माझी बदनामी केलेबाबत तक्रार दाखल केली होती. त्यानंतर दोन दिवसांनी मी पुन्हा पोलिस स्टेशनला गेले आणि मी दिलेल्या तक्रारीचे काय झाले असे विचारले असता मला पोलिसांनी सांगितले की, आम्ही तपास केला नाही, तुम्ही कोर्टात केस दाखल करा.

३. त्यानंतर मी वकिलांमार्फत प्रकाश सावंत यास दिनांक १२/०५/२०२६ रोजी नोटीस पाठविली. दिनांक २१/०५/२०२६ रोजी प्रकाश सावंत याने वकिलांमार्फत नोटीस उत्तर पाठविले व त्यामध्ये बदनामी करणारा मजकुर नमुद केला. त्यानंतर मी माहितीच्या अधिकाराअंतर्गत माझ्यावर दाखल झालेल्या तक्रारीबाबतचे कागदपत्रे मागविले. सदर कागदपत्रे मला महिनाभरानंतर मिळाले. त्यामुळे मी प्रस्तुतची केस दाखल केली आहे. प्रकाश सावंत याने माझी गावामध्ये तसेच गल्लीमध्ये बदनामी केलेली आहे. त्यामुळे गावातील लोकांचा, शेजारी राहणा-या लोकांचा व घरातील लोकांचा माझ्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदललेला आहे. त्यामुळे

मला त्रास सहन करणे भाग पडत आहे. माझी बदनामी झाली याबाबत सखोल चौकशी होवुन मला न्याय मिळावा व प्रकाश सावंत यांना जास्तीत जास्त कडक शिक्षा व दंड व्हावा ही विनंती आहे. प्रकाश सावंत याच्या घरात चोरी झाली याबाबत माझा काहीही संबंध नाही.

४. या व्यतिरिक्त मला आणखी काही सांगायचे नाही. सदरचा मजकुर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. तो मला आजरोजी वाचुन दाखविला असुन मी सांगितल्याप्रमाणे लिहिलेला आहे. **(प्रस्तुत प्रकरण ई-फाईलिंग प्रकरण असल्याने त्यावर साक्षीदाराची सही घेण्यात आलेली नाही. सदर बाब साक्षीदार व साक्षीदारतर्फे विधिज्ञ श्री. एस. एस. पाटील यांच्या निर्दशनास आलेली आहे.)**

--------------------------
(साक्षीदाराची सही/अंगठा)

समोर,

ASHATAI NARAYAN SARAK
Digitally signed by ASHATAI NARAYAN SARAK
Date: 2026.08.28 18:15:59 +0530

**(ए. एन. सरक)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.१, चंदगड.

दिनांक- २८/०८/२०२६.
चंदगड.